IFSIJ IMPACT FACTOR: 6.225 ISSN: 2455-1511

# SANSKRUTI

## International Multidisciplinary Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue: 010 December - 2021



''नहिं ज्ञानेन सदृश्यमं पवित्रमिह विद्यते''

ग्रामीण विकास शिक्षण संस्था, संचालित

## कला एवं वाणिज्य महाविद्यालय, उंडाले

तहसील– कराड, जिला– सातारा

(शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापुर संलग्न)

द्वारा आयोजित

### आंतरविद्याशाखीय एकदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी

# साहित्य और समाज सुधार

२९ सितंबर २०२१

**Special Issue Editor:** Prof. Javid Shaikh

**Guest Editor:** Prof. Smt. Sushama Surve

**Editor-in-Chief:** Prof. Santosh Bongale

## Special Issue Index



| Sr. No. | Title of the Paper & Author's Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Social Concerns in the 19th Century English Novel<br>*Dr. Vijay Nagnath Mhamane* | 10-14 |
| 2 | Social Enlightenment in Mulk Raj Anand's Novel 'Untouchable'<br>*Dr. Sandeep G. Ladkar* | 15-18 |
| 3 | WOMEN AND SPORTS<br>*Mr. Sandeep Sahadev Patil* | 19-20 |
| ४ | क्रांति की ज्वाला : अग्निध्वजा<br>*प्रा. डॉ. प्रकाश आठवले* | 21-27 |
| ५ | प्रेमचंद केउपन्यास साहित्य में समाज सुधार<br>*प्रा. दत्तात्रय शेळके* | 28-32 |
| ६ | कबीर का समाज दर्शन<br>*डॉ. शरद पारखे* | 33-37 |
| ७ | हिंदी साहित्य के मध्ययुग तथा आधुनिक युग मे समाज सुधार<br>*प्रा. जाविद शमशुद्दीन शेख* | 38-44 |
| ८ | समाजप्रबोधन : संकल्पना व स्वरूप<br>*श्रीमती साधना सुखदेव जाधव* | 45-47 |
| ९ | आगरकरांच्या निबंध वाङ्मयातील स्त्री शिक्षणविषयक विचार<br>*श्री. योगेश शेळके* | 48-50 |
| १० | मराठी संत साहित्यातील समाज प्रबोधन<br>*श्री. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके* | 51-56 |
| ११ | "ब्र" कादंबरी आणि समाज प्रबोधन<br>*प्रा. डॉ. रत्नप्रभा काशिनाथ पगारे* | 57-59 |
| १२ | महात्मा फुले यांच्या 'अखंड' या काव्यातील सामाजिक प्रबोधनात्मक विचार<br>*प्रा. श्री. वैभव नानासाहेब कांबळे* | 60-63 |
| १३ | संत तुकारामांच्या अभंगातील समाजप्रबोधन<br>*डॉ. संभाजी शिवाजी जाधव* | 64-68 |
| १४ | मराठी कादंबरीतून झालले समाज प्रबोधन<br>*शिल्पा संजय कुंभार* | 69-73 |
| १५ | संत तुकारामांच्या अभंगातील समाज प्रबोधन<br>*प्रा. सुनिता दत्तात्रय दळवी* | 74-80 |
| १६ | ई— बुक्स आणि समाजप्रबोधन<br>*श्रीमती अनिता म. कोथळीकर, डॉ. पांडुरंग बा. पाटील* | 81-88 |

| | | |
|---|---|---|
| १७ | चित्रपट आणि समाज प्रबोधन<br>*प्रा. डॉ. हेमंत नामदेव कुंभार* | 89-94 |
| १८ | झाडीपट्टी रंगभूमीवरील नाटकांतील सामाजिकता<br>*प्रा. डॉ. विजय रैवतकर* | 95-98 |
| १९ | दलित साहित्य आणि समाजप्रबोधन<br>*प्रा. डॉ. संदीप कडू माळी* | 99-103 |
| २० | मराठी कादंबरीतील आदिवासी समाजदर्शन<br>*डॉ. योगेश हिरामण महाले* | 104-111 |
| २१ | आधुनिक मराठी साहित्यातील समाज प्रबोधन<br>*सौ. विजयालक्ष्मी देवगोजी, डॉ. मनिषा नेसरकर* | 112-118 |
| २२ | संत साहित्यातून परिष्कृत झालेले समाज प्रबोधन<br>*प्रा. डॉ. गणपत काशिबा हराळे* | 119-124 |
| २३ | संत तुकारामांचा समाज जागर<br>*प्रा. सुहास व्यंकटेश कुलकर्णी* | 125-129 |
| २४ | महात्मा फुले यांनी साहित्याच्या माध्यमातून केलेले समाजप्रबोधन<br>*प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे* | 130-132 |
| २५ | मराठी संतसाहित्यातील समाजप्रबोधन<br>*प्रा. डॉ. आबासाहेब पिरगोंडा नाईक* | 133-135 |
| २६ | साहित्यातून पर्यावरणीय समाजप्रबोधन<br>*प्रा. सौ. सुषमा विजय सुर्वे* | 136-143 |
| २७ | संत तुकाराम यांच्या अभंगातील समाज प्रबोधन<br>*प्रा. श्री. प्रदीप सहदेव चोपडे* | 144-150 |
| २८ | साठोत्तरी मराठी प्रादेशिक कादंबरीतून व्यक्त होणारी सामाजिक जाणीव<br>*डॉ. लालबा दुमटकर* | 151-155 |
| २९ | संत एकनाथांनी भारुडातून केलेले समाजप्रबोधन<br>*प्रा. श्री. विलास सखाराम सुर्वे* | 156-161 |

Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) – 6.225
Special Issue 010- साहित्य और समाज सुधार
ISSN: 2455-1511
December - 2021

# संत तुकाराम यांच्या अभंगातील समाज प्रबोधन

**प्रा.प्रदीप सहदेव चोपडे**
कला व वाणिज्य महाविद्यालय,उंडाळे
मो.७०५७१७०२०१.

**सारांश.**

*जागतिक पातळीवर पंधराव्या शतकाच्या मध्यापासून प्रबोधन युगाला सुरुवात झाली असे माणले जाते. पण भारत भूमीत इ.स.पूर्व काळापासून सिध्दार्थ गौतम् बुध्द व महावीर यांनी सामाजीक प्रबोधन केले होते. मराठी साहित्यामध्ये १२व्या शतकापासून ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्या अभंगादी वाङमयातून समाज प्रबोधनात्मक विचार दिसून येतात. या वारकरी संतामधील संत तुकाराम यांच्या अभंगामधून भक्ती सोबतच समाजातील विकरांवर मोठ्या प्रमाणावर प्रहार केले आहेत.त्यांनी काळ, परिस्थिती, निमित्त कारणे समाजाला प्रबोधन करून विवेकाचा, संयमाचा नितीचा, त्यागाचा, सत्याचा, कल्याणाचा, विज्ञाननिष्ठेचा मार्ग अंगीकारायला सांगितले आहे.स्वार्थी वृत्ती सोडून त्यागाच्या मार्गावर चालावे. परद्रव्य, परनारी यांची अभिलाषा धरू नये. चूकीच्या मार्गाने धन मिळवू नये. धनासाठी मुलींची विक्री करू नये. लग्नासारख्या पवित्र बाबतीत पैशांचा, हुंड्याचा व्यवहार करू नये. स्त्रीयांनी—पुरूषांनी व्याभिचार करू नये. पुरूषांनी परस्त्रीला मातेसमान मानावे. दुसऱ्यांना हीन लेखू नये.अर्थप्राप्तीसाठी देव, धर्म यांना साधन बनवू नये.नवस करू नये.अशा स्वरूपाचे प्रबोधनात्मक विचार आपल्या अभंगातून मांडले आहेत.*

***कळशब्द (keyword)**:संत तुकाराम, सामाजिक प्रबोधन, यज्ञयाग*

**प्रास्ताविकः**

प्रबोधन या शब्दासाठी इंग्रजीमध्ये Ranaissance हा पर्यायी शब्द वापरला जातो प्रबोधन म्हणजे जुन्या आचार—विचारांना, कालबाह्य रूढी, प्रथा, परंपरा यांना टाकून देऊन अथवा त्यामध्ये बदल घडवून नव्याने जीवन जगण्याचा प्रयत्न करणे होय.असे हे प्रबोधन जागतिक पातळीवर सर्वप्रथम युरोप खंडात इटलीमध्ये घडून आले अशी ऐतिहासिक नोंद केली जाते. इ.स.१४५३ मध्ये तुर्कानी कॉन्स्टॅटिनोपल हे शहर जिंकून घेतले. तेंव्हा तेथील ग्रीक विद्वान, पंडित या शहरातून आपण केलेले लेखन, संशोधन व विविध ग्रंथ घेऊन बाहेर पडले व संपूर्ण युरोपभर पसरले. त्यांच्या लेखनाचा, संशोधनाचा अभ्यास करून लोकांमध्ये नवीन जीवनवृत्ती निर्माण झाली. इथूनच प्रबोधन युगाला सुरूवात झाली असे म्हटले जाते. म्हणूनच त्याला इंग्रजीमध्ये Ranaissance असे म्हणतात.प्रसिध्द तत्ववेत्ता कांट प्रबोधन युगास चिकित्सेचे युग असे संबोधतात.युरापमध्ये प्रबोधन कालखंडात शास्त्रीय शोध, संशोधन, बुध्दीप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मातील व कायद्यातील दाहकता यांची चिकित्सा मोठ्या प्रमाणात वाढीस

लागली होती. प्रत्येक गोष्टीचा कार्य–कारण भाव जाणून घेण्याची वृत्ती निर्माण झाली होती. जागतिक पातळीवर या गोष्टी घडत असताना महाराष्ट्र भूमीत काही संतानी चिकित्सकपणे समाजातील विविध घटकांचा अभ्यास करून लोकांमध्ये प्रबोधन करण्यास सुरूवात केली होती. त्यामधील एक महत्वपूर्ण संत म्हणजे संत तुकाराम. त्यांच्या अभंगातील सामाजिक प्रबोधनाचा अभ्यास या निबंधात केला आहे.

**उद्दिष्ठेच:**

१)संत तुकाराम यांच्या अभंगातील सामाजिक प्रबोधनात्मक विचारांचा शोध घेणे.

२)संत तुकाराम हे लोकशिक्षण देणारे संत होते याचा आढावा घेणे.

३)संत तुकारामांच्या अभंगातील बुध्दीप्रामाण्यवाद तपासणे.

४) संत तुकारामांच्या अभंगातील व्यवहारज्ञानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:**

सदर शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे तसेच ऐतिहासिक संशोधन पध्दतीचाही वापर केला आहे.

**संत तुकाराम यांच्या अभंगातील समाज प्रबोधन**

मानवी जीवनामध्ये काळ, वेळ, परिथिती, संदर्भ बदलले की काही गोष्टी कालबाह्य ठरतात. तेंव्हा अशा गोष्टींचा, विचारांचा त्याग करून निसर्गनियमानुसार बदलत जाणे महत्वाचे असते. अशावेळी विचारवंत, तत्वचिंतक, निर्भिड अभ्यासू व्यक्ती कालबाह्य गोष्टींचा त्याग करावयास सांगतात. त्यांच्या चिंतणातून, अभ्यासातून, अनुभवातून ते बदल सुचवितात. पण पारंपारिक दृष्टिकोणातून पाहणाऱ्यांना हे बदल मान्य नसतात. कालांतराणे हळूहळू या लोकांनाही नवीन विचार पटू लागतात. लोक जून्या विचारांना सोडून अथवा त्यामध्ये बदल घडवून आणतात; त्यांना प्रबोधक म्हटले जाते आणि त्यांचे कार्य म्हणजे प्रबोधन असते. या सर्व घडामोडी समजामध्ये व समाजासाठीच घडत असतात म्हणून त्याला आपण समाज प्रबोधन म्हणतो. पण ही प्रक्रीया सहज आणि सोपी नसते. कारण जुन्या विचारांना कवटाळण्यामध्ये काही स्वार्थ लपलपलेला असतो. उदा. अर्थप्राप्तीचे साधन, सामाजिक वर्चस्वाचे साधन, किर्तीचे साधन असलेल्या व्यक्ती त्याला कडाडून विरोध करतात. पण समाज प्रबोधक अशा विरोधाला न जुमानता प्रसंगी प्राणांची आहूती देऊन समाजहितासाठी आपले प्रबोधनात्मक कार्य करीतच असतात. संत तुकारामांच्या चरित्रातून हेच दिसून येते.

- **संत तुकारामांचे चरित्र:**

संत तुकारामांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले. त्यांचा जन्म देहूस इ.स .१५९८(श.१५२०)मध्ये झाला. त्यांचे वडिल देहूचे महाजन होते. पूर्वापार विठ्ठलभक्ती चालत आलेल्या सधन कुटुंबात तुकारामांचा जन्म झाला होता. वयाच्या सतराव्या वर्षापासून त्यांच्या

आयुष्यात विविध आपत्ती आली.आई, बाप, भावजय एकापाठोपाठ वारले. मोठा भाऊ विरक्त झाला. दुकानाचे दिवाळे निघाले.दुष्काळामुळे गुरे–ढोरे मेली, पहिली बायको व मुलगा डोळ्यादेखत मृत्यू पावले.अशा विविध आघातातून सुख शोधण्यासाठी विठ्ठलभक्तीत रममान झाले. इथूनच जीवनाचा चिकित्सकपणे अभ्यास करून स्वत:चे तत्वज्ञान मांडले.ते दु:खाने खचून न जाता लोकांना जीवन शिक्षण देणारे लोकशिक्षक बनले. त्यांच्याविषयी ल.रा.नसिराबादकर म्हणतात,'अधिकार तैसा उपदेश करून; बुडत्या जनांना, स्त्री–शुद्रांना भक्तिपंथात सामावून, त्यांना उध्दाराचा मार्ग दाखविणारे;'यातिहीन नये एकों ज्या वेदा तया दिले पद वैकूंठीचे' असे स्वत:च्या उदाहरणाने सिध्द करणारे महापुरूष म्हणजे तुकाराम'(प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास,लेखक ल.रा नसिराबादकर)यावरून संत तुकारामांच्या कार्याची थोरवी समजते. शेवटी इ.स.१६४९ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा देह सापडला नाही; म्हणून वारकरी संप्रदायात ते सदेह वैकूंठाला गेले असे माणले जाते

- **नवस करू नये:**

आपल्या मनासारख्या गोष्टी घडाव्यात म्हणून देवाशी करार करणे म्हणजे नवस.शुद्र देवतांना नवस बोलला जातो.अघोरी कृत्ये केली जातात.अनायासे नवस बोलल्यासारखे घडलेच तर त्यासाठी कोंबडे–बकरे कापले जाते किंवा नरबळी देण्यासारखे अघोरी कृत्ये केली जातात.संत तुकाराम या गोष्टीकडे डोळसपणे पाहतात.

'नवसे होई संतती। तरी का करावा लागे पती?'

असा परखडपणे सवाल ते करतात.संतती होण्यासाठी पती–पत्नी एकत्र येणे गरजेचे असते; केवळ नवस बोलून कोणताही देव संतती देवू शकत नाही. हे व्यवहार ज्ञान संत तुकारामांना ठाऊक होते. ते परखडपणे त्यांनी सांगितले आहे.नवस ही अंधश्रध्दा आहे.याविषयी ते सांगतात,

वृक्ष न धरी पुष्पफळ। काय करील वसंत काळ।।
वांझा न होती लेकुरे। काय करावे भ्रतारे।
नपुंसका पुरूषाशी। काय करील बाईल त्यासी?
प्राण गेलिया शरीर। काय करील वेव्हार?
तुका म्हणे जीवने विण। पीक नव्हे नव्हे जाण।।(७६५)

जर वृक्षामध्ये परागकण निर्माण होत नसतील तर, वसंतऋतू काही करू शकत नाही. बाई वांझ असेल तर पती काय करू शकेल. पुरूष नपुंसक असेल तर बाई काय करणार? अशावेळी नवस करून किंवा नैवेद्य करून काहीही साध्य होणार नाही.तरीही लोक अज्ञानामुळे बळी ठरतात. त्यांना तुकाराम म्हणतात,

'आणिकांच्या कापती माना। निष्ठूरपणा पार नाही।।

करिती बेटे उसणवारी। यमपुरी भोगावया।।
सेंदराचे दैवत केले। नवस बोले तयासी।।
तुका म्हणे नाचती पोरे। खोडिता येरे अंग दु:खा।।(२५६)

नवस करणे म्हणजे अंधश्रध्दा आहे. कोणताही देव भक्ताकडून कोणत्याही पदार्थांची अभिलाषा धरत नसतो. मानवच आपल्या स्वार्थासाठी असे सेंदराचे देव बनवूण, त्यांच्यापुढे निष्पाप प्राण्यांचे बळी द्यावयास सांगतात. लोकांनी डोळसपणे या गोष्टी पहावयात. असा उपदेश तुकारामांनी केला आहे

- **व्याभिचार करू नये:**

प्राचीन काळापासून मानवामध्ये हिणकस प्रवृत्ती दिसून येते. स्त्रीयांच्यावर, गरीबांवर मोठ्या प्रमाणावर व्याभिचार केले जात होते. त्यांचे प्रबोधन करताना संत तुकाराम म्हणतात,

इतुकें करी भलत्या परी। परद्रव्य परनारी।
सांडुनि अभिलाषा अंतरी। वर्ते वेव्हारी सुखरूप।।(६६१)

जीवनात काहीही केले नाही तरी चालेल केवळ इतकेच कर की परद्रव्य, परनारी यांची अभिलाषा मनात धरू नको अशी अभिलाषा सोडली नाही तर सुख कधीही प्राप्त होऊ शकणार नाही.

परद्रव्य परनारीचा अभिलास। तेथूनच हारास सर्वभाग्या।।(१६४१)

परद्रव्य आणि परनारीची अभिलाषा मनात निर्माण झाली की, तिथूनच अधोगतीला सुरूवात होते

'साधने तरी होय दोन्ही। जरी कोणी साधील।।१ ।।
परद्रव्य परनारी। याचा धरी विटाळ।।२ ।।
देवभाग्ये घरा येती। संपत्ती त्या सकळा।।३ ।।
तुका म्हणे शरीर। गृह भांडार देवाचे।।४।।(५७५)

देवाचा साधक होण्याची अनेक साधने आहेत. पण इतर अवघड साधने करण्याऐवजी केवळ परद्रव्य आणि परनारी यांचा विटाळ मानण्याचे एकच साधन केले तरीही त्याला मनासारखी संपत्ती प्राप्त होईल. कारण देह हे देवाचे गृहभांडार आहे; त्याला आपण पवित्र ठेवले पाहिजे. असा उपदेश त्यांनी केला आहे.

- **विषमता मानू नये:**

परमेश्वर विश्वस्वरूप, विश्वव्यापक, चराचरव्याप्त आहे. निसर्गाच्या अणू—रेणूत परमेश्वराचा अंश आहे. निसर्ग प्राणिमात्रांमध्ये कधी भेद करत नाही; पण मानव मात्र माणसामाणसांमध्ये भेद करतो. हे निसर्ग नियमा विरूध्द आहे. ही सर्व सृष्टी देवाने निर्माण केली आहे. तो भेद करत नसेल तर माणवाने भेद का निर्माण करावा?

'विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ।।'

तरीही मानव—मानवाला जातीधर्माच्या नजरेतूणच पाहतो. याविषयी संत तुकाराम म्हणतात,

‘याता याती धर्म नाही विष्णूदासा।।
पुसने काही जाती मुळ। लागो वेळ जड।।(४२९९)

ल.का.मोहरीर याविषयी सांगतात,‘विषमता ही मुळात मनुष्यकृत असून समता ही नैसर्गिक आहे म्हणून सर्व भूतमात्रात समतेचा व्यवहार घडावा, हा आग्रह धरलेला आहे. तुकारामांनी उच्चनीच भेदभाव पसरवणाऱ्या जातीप्रथेचा त्यांनी निषेध केलेला आहे’ (संत तुकारामांची जीवननिष्ठा,ल.का.मोहरीर) यातूनच संत तुकारामांच्या सामाजिक समतेचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

- **देवाच्या नावावर अर्थप्राप्ती करू नये:**

देवा—धर्माचा वापर करून जो पैसा मिळवितो तो चांडाळ म्हटला पाहिजे असे तुकारामांचे मत आहे.देवाच्या हरिकथेचा बाजार मांडणारे देवाला आवडत नाहीत. अशा लोकांचे मन हरिकथेवर नाही तर केवळ पैशावर असते.पोटासाठी देवाला साधन बनविणारे लोक चांडाळ आहेत.

‘कन्या, गो करी कथेचा विकरा। चांडाळ तो खरा तया नावे।।
आशबध्द नये करू ते करिती। तुका म्हणे जाती नरकामधी।।(१२३)

कन्या, गाय आणि हरिकथेला जे विकतात ते कधीही सुखी होणार नाहीत. देवाच्या नावाने दुकान मांडणारे भक्त नाहीत.पोटासाठी भक्तीच ढोंग करणाऱ्याला पांडुरंग कसा भेटेल?

‘नाही देवार्थन। असे मांडले दुकान।।
उभ्या बाजारात कथा। हे तो नावडे पंढरीनाथा।।
अवघे पोटासाठी ढोंग। तेथे कैचा पांडुरंग।।(२७२)

संत तुकारामांना ढोंगी भक्तीचा राग आहे. देवाचा वापर करून स्वत:ची पोटे वाढवणाऱ्याविषयी त्यांच्या मनात मोठ्या प्रमाणात राग होता. हे त्याच्या इतर अभंगामधूनही दिसून येते.तळागळातील सर्व व्यवस्थेचा तुकारामांनी चिकित्सक अभ्यास केला होता.म्हणूनच परखडपणे ते प्रबोधन करतात.

- **कन्येचा विकरा करू नये:**

कन्या हे बापाचे धन असते. आपल्या घराची ती शान असते. म्हणूनच लोक मुलींना जीवापाड जपतात. पण समाजात अशाही काही व्यक्ती आहेत त्या आपण जन्म दिलेल्या मुलींची विक्री करतात.अशा लोकांचे संत तुकाराम प्रबोधन करतात.

‘कन्येचा जे नर करीत विकरा।
ते जाती अघोरा नरकपाता।।’

त्याचप्रमाणे तत्कालीन हुंडा पध्दतीचा ही विरोध तुकारामांनी केला आहे. कोणत्याही आई—बापाने हुंडा देऊ अथवा घेऊ नये.हुंडा देण्याची प्रथा ही चूकीची आहे.या प्रथेमुळे

लोकांच्यामध्ये लालसा वाढते .त्याचा मुलींच्या आई—वडीलांना मोठ्या प्रमाणात त्रास होतो .हुंड्यासाठी मुलींचा छळ केला जातो, मारहाण केली जाते, अपमान केला जातो, पैशाच्या अभिलाषेने खूनही केला जातो. म्हणून ही अघोरी प्रथा बंद झाली पाहिजे. त्यासाठी अभंगाच्या माध्यमातून संत तुकाराम प्रबोधन करताना दिसतात.

- **लग्नप्रसंगी डामडौल करू नये:**

लग्नामध्ये डामडौल मिरवण्याची प्रथा आजही मोठ्या प्रमाणात आहे.ऐपत नसतानाही एकमकांच्या ईर्शेपाई किंवा समाजात कमीपणा वाटेल अशा चुकीच्या समजूतीने लोक कर्ज घेऊन लग्नात खर्च करतात. खोटा डामडौल मिरवतात आणि कर्ज फेडण्यासाठी आयुष्य घालवतात. असा डामडौल काय कामाचा? म्हणून तुकाराम महाराज म्हणतात,

दिवट्या वाद्ये लावुनि खाणें। करूनि मंडण दिली हातीं।।१ ।।

.........................पुढे नरका सामग्री।।६ ।।(२६९)

लग्नामध्ये रोषणाई करून, सनई—चौघडे वाजवून, पंचपक्वान्नाच्या जेवणावळी उठवून, मुलीला अलंकारानी मढवून नवऱ्याच्या हाती सोपवणे, व्याही—विहीण यांचा आहेर देऊन गौरव करणे, वर पक्षाच्या सर्व मागण्या पूर्ण करण्यासाठी लाचारी पत्करणे. या सर्व भ्रामक गोष्टी आहेत.अशा चूकीच्या समजूतीत अडकून पडू नका असे तुकाराम महाराज म्हणतात. जो अशा समजूतींचा हव्यास करून वधू पक्षाला त्रास देईल तो नरकात जाईल असा इशारा त्यांनी दिला आहे.

- **यज्ञ,व्रत,तप करू नये:**

ब्रह्म जे देखणे द्वैत जेव्हा गेले। शरीर ते जाले ब्रह्मरूप।।

यजन याजन तप व्रते करिती। विकल्पे नागविती शुध्द पुण्या।।

यज्ञ करणे म्हणजे भक्ती नव्हे; तर धन, द्रव्य, समय व्यर्थ घालवणे आहे.देवाचे स्वरूप जाणले, अनुभवले विश्वस्वरूप परब्रह्माची अनुभूती आली की शरीर ब्रह्मरूप होते . त्यामुळे यज्ञ—यजन— याजन करणे किंवा व्रत—वैकल्य—तप करणे यामुळे केवळ मनात विकल्प निर्माण होतात.यज्ञापाई लोक नागविले जातात, त्यांचे शोषण केले जाते. याविषयीच्या एका अभंगात संत तुकाराम म्हणतात,

‘तोंड धरूनि मेंढा मारा। ब्राह्मण म्हणती यज्ञ करा।।

जित्या तुळशीशी तोडा। पुजा निर्जिव दगडा।।(४९९)

म्हणून यज्ञाच्या नादी न लागता माणसांनी चांगले कर्म आचरण केले पाहिजे.यज्ञ करून लोकांची केवळ फसवणूक केली जाते. त्यांचे आर्थिक शोषण केले जाते.त्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी डोळे उघडून या गोष्टीचा विचार करावा.असे प्रबोधन संत तुकाराम करतात.

एकूणच संत तुकारामांच्या चरित्राचा आणि त्यांच्या अभंगाचा अभ्यास करता असे दिसून येते की, तत्कालीन परिस्थितीचा विचार करता तुकाराम हे क्रांतिकारक समाजसुधारक होते. तसेच आपल्या अभंगाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणारे एक थोर विचारवंत होते.

**निष्कर्ष:**

१. संत तुकारामांनी अभंगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन केले आहे.
२. संत तुकारामांनी अभंगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात लोकजागृती केली आहे.
३. संत तुकाराम व्यवहारवादी संत होते.
४. समाजातील अंधश्रध्दावर कठोरपणे टिका केली आहे.
५. समाजातील दुर्गुण बाहेर काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे
६. ढोंगीपणावर त्यांनी कठोर प्रहार केला आहे.

**संदर्भ**

१. जोशी प्र. न. ,सार्थ तूकाराम गाथा, खंड पहिला, श्रीभारत बुक डेपो ग्रंथ प्रकाशन मुंबई ४, प्रथम आवृत्ती: तुकारामबीज १९६६.
२. जोशी प्र. न. ,सार्थ तूकाराम गाथा, खंड दुसरा, श्रीभारत बुक डेपो ग्रंथ प्रकाशन मुंबई ४, दुसरी आवृत्ती: आषाढी एकादशी १९६८.
३. जोशी प्र. न. ,सार्थ तूकाराम गाथा, खंड तिसरा, श्रीभारत बुक डेपो ग्रंथ प्रकाशन मुंबई ४, दुसरी आवृत्ती: आषाढी एकादशी १९६९.
४. नसिराबादकर ल. रा. ,प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दहावी आवृत्ती: २०१०
५. मोहरीर ल. का. , संत तुकारामांची जीवन निष्ठा, सविता प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १९९४.